सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४८ | रविवार, दि. ३१ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४०१००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६००/-
भाव प्रती १० ग्राम







अमळनेर : १) शेतकरी सहकारी संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी साने गुरूजी विद्यालयासमोर मतदानासाठी झालेली गर्दी. २) रस्ता बंद असल्याने वाहनांचा झालेला खोळंबा. ३) मतदानाकरीता आलेल्या मतदारांनी रस्त्यातच वाहने पार्क करुन वाहतूकीला अडचण निर्माण केली होती. ४) मतदान करताना खासदार स्मिताताई वाघ ५) माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील ६) शेतकरी पॅनलचे प्रा. सुभाष पाटील ७) माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील ८) भाजप युवा मोर्चा प्रदेश चिटणीस सौ. भैरवीताई वाघ-पलांडे ९) मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मुलाची मदत घेवून मतदान स्थळी उपस्थित झालेल्या आजीबाई. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# अमळनेर शेतकी संघासाठी शांततेत ४८ टक्के मतदान

## आज मतमोजणी : सर्वांचे निकालाकडे लक्ष

**ग्लोबल महातेजृत वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तालुका शेतकरी सहकारी संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी (सन २०२६ ते २०३१) शनिवार, दि. ३० मे रोजी उत्साहपूर्ण व शांततापूर्ण वातावरणात एकूण ४८.८५ टक्के मतदान झाले. सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत शहरातील साने गुरुजी विद्यालय केंद्रात ही प्रक्रिया पार पडली. मतमोजणी रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी आठ वाजता शहरातील इंदिरा भवनात सुरू होऊन सायंकाळपर्यंत निकाल जाहीर होणार आहे.रखरखत्या उन्हाचा परिणाम मतदानावर दिसून आला असला, तरी दिवसभर मतदारांनी मतदान केंद्रांवर हजेरी लावत लोकशाहीतील हक्क बजावला. मतदानासाठी व्यक्तीशः मतदारसंघाचे १६ व सोसायटी मतदारसंघाचे १ अशी एकूण १७ केंद्रे उभारण्यात आली होती. संपूर्ण प्रक्रियेसाठी १३५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट), भाजप तसेच काँग्रेस पुरस्कृत पॅनल रिंगणात होते. यामध्ये एकूण १५ जागांसाठी सहकार पॅनलच्या माध्यमातून आमदार अनिलदादा पाटील व माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांच्या नेतृत्वात १५, किसान विकास पॅनलतर्फे खासदार स्मिताताई वाघ यांच्या नेतृत्वात १४, तर शेतकरी पॅनल अर्थात काँग्रेसच्या सुभाष पाटील यांच्या नेतृत्वात १० जागांसाठी उमेदवार रिंगणात होते.मतदानाच्या आकडेवारीनुसार व्यक्तीशः मतदारसंघातील एकूण १६,३३२ पैकी ७,९२५ मतदारांनी मतदान केले. या गटात ४८.५२ टक्के मतदानाची नोंद झाली. सकाळपासूनच केंद्रांवर मतदारांची मोठी उपस्थिती दिसून आली, तर दुपारनंतर मतदानाचा वेग वाढल्याने अंतिम टक्केवारीत भर पडली.दुसरीकडे सोसायटी मतदारसंघातही मतदारांचा उत्साहपूर्ण प्रतिसाद होता. एकूण १०७ पैकी १०६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे या गटात तब्बल ९९.०६ टक्के मतदान नोंदविले गेले. केवळ एका मतदाराच्या अनुपस्थितीमुळे शंभर टक्के मतदानाचा विक्रम हुकला.दोन्ही गटांचा एकत्रित विचार करता एकूण १६,४३९ पैकी ८,०३१ मतदारांनी मतदान केले असून एकूण मतदानाची टक्केवारी ४८.८५ इतकी नोंदविण्यात आली आहे.आता सर्वांचेच लक्ष मतमोजणीकडे लागले आहे.

### साने गुरुजी शाळेबाहेर गर्दी; वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा

शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचालींना वेग आला असून धुळे रस्त्यावरील साने गुरुजी शाळेजवळ मतदारांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. मतदानासाठी आलेल्या मतदारांबरोबरच उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीही शाळेबाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी काही उमेदवार आपल्या मतदारांना भाऊ, दादा लक्षात ठेवा अशा घोषणा देत शेवटच्या क्षणी मतदारांना आवाहन करताना दिसून आले. त्यामुळे परिसरात अधिकच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.गर्दी वाढल्यामुळे नागरिकांनी आपली वाहने रस्त्यावरच दोन्ही बाजूला उभी केल्याने अनियंत्रित पार्किंग झाले आणि वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. धुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्यानेदिवसभरात अनेक वेळा ट्रॅफिक जामची परिस्थिती निर्माण झाली.अचानक वाढलेल्या गर्दीमुळे वाहतूक पोलिसांची चांगलीच तारांबळ उडाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले, मात्र गर्दीचे प्रमाण मोठे असल्याने वाहतूक सुरळीत करण्यात अडचणी येत होत्या.दरम्यान, निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला असला तरी मतदान केंद्राबाहेरील गर्दी आणि अपुऱ्या व्यवस्थेमुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### दिनविशेष

३१ मे

- ब्रिटीश भारतात पहिले पोस्ट सेवा कार्यालय स्थापन झाले.
- भारतातील प्रत्येक मान्यताप्राप्त खाजगी शाळेत गरीब मुलांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी कायदा करण्यात आला.

# तापी नदी पात्रातील अवैध डिझेल साठा जप्त

## १४७० लिटर डिझेल विक्रीचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सावखेडा येथील तापी नदी पात्रात सापडलेल्या अवैध डिझेल साठ्याबाबत योग्य तो खुलासा न आल्याने १४७० लिटर डिझेल शासन जमा होऊन तो विक्री करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी २९ रोजी काढले आहेत. उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे , तहसीलदार रुपेशकुमार सुराणा , मंडळाधिकारी सौ. कल्याणी पाटील , प्रभारी पुरवठा निरीक्षक सचिन निकम , पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी सावखेडा येथे वाळू ठेक्यांवर अचानक छापा टाकला असता गिरीश तुळशीराम बेलदार यांच्याकडे २८ रोजी सुमारे ७ कॅन मध्ये १ लाख ४२ हजाराचे १४०० लिटर डिझेल एक लाख ४२ हजार रुपयांचे व तीन कॅन मध्ये ७० लिटर असे एकूण एक लाख ५५ हजार रुपयांचा १४७० लिटर डिझेलचा बेकायदेशीर साठा महसूल पथकाला आढळून आला होता. महसूल पथकाने तो साठा जप्त करून अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. तसेच



मालकाला कलम ६ प्रमाणे कारणे दाखवा नोटीस दिली होती. मात्र मालकाने मुदतीत खुलासा केला नसल्याने श्री. भंगाळे यांनी तो साठा जप्त केला आहे. अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ६ व ६ अ प्रमाणे जप्त मालाची विल्हेवाट लावण्याचे श्री. भंगाळे याना प्राप्त झाले म्हणून हे डिझेल विक्री करण्यासाठी त्यांनी शहरातील सर्व पेट्रोल पंपावरचे डिझेल दर मागवले होते. त्यात धुळे रस्त्यावरील श्रीकृष्ण पेट्रोल पंप (नायरा) वरचे दर सर्वाधिक १०१.५७ रुपये आढळून आल्याने प्रशासनाने ते जप्त डिझेल त्यांना विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातून आलेली रक्कम क्रिमिनल डिपॉझिट (८४४३) या लेखाशीर्षकाखाली शासन जमा करण्याचे आदेश श्री. भंगाळे यांनी दिले आहेत.

**डिझेलचा टँकरच नदीत उतरतो ?**

ज्या प्रमाणात नदी पात्रात अवैध डिझेल सापडले आहे ते पाहता इतक्या मोठ्या प्रमाणात डिझेल पंपावर कोणी टाक्यांच्या माध्यमातून शासकीय आदेशांना डावलून विक्री करण्याची शक्यता मुळीच नाही. सदर नदी पात्रात विविध अवजड वाहने, जेसीबी, पोकलँड आदींच्या डिझेल टँक्स भरण्यासाठी थेट टँकरच नदीत येतो. रेती व्यावसायिकांच्या अवजड वाहनांच्या डिझेल टँक्स फुल करतो . शिवाय मोठमोठ्या टाक्यांमध्येही एक्स्ट्रा डिझेल भरून देतो. सदर पंप चालकावर यंत्रणेचाच आशीर्वाद असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अवैध व्यवसायिकांना पूर्ण टँकर मिळतो तर दुसरीकडे शेतीसाठी ऐन हंगामात डिझेल मिळत असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.

**जळगाव व्हाया पाळधी**

**पायी मोर्चाची तयारी?**

सदर सततच्या गैरप्रकारांकडे यंत्रणेचे लक्ष वेधण्यासाठी कहींनी पायी मोर्चाची तयारी सुरू केली आहे. सदर मोर्चा आधी पाळधी येथे पालकमंत्र्यांना भेटून सर्व प्रकारचे पुरावे व लेखी देणार आहे. ते पाहून दोषींवर कठोर कारवाई व्हावी यासाठी आग्रही भूमिका घेणार आहेत . तेथून सदर मोर्चा तीव्र उन्हाची पर्वा न करता जिल्हाधिकाऱ्यांकडे कैफियत मांडण्यासाठी जाणार असल्याचे सांगितले.




संग्रहित प्रतिमा

> सावखेडा येथील वाळू प्रकरणातील नदीपात्रात कारवाई करुन जप्त करण्यात आलेला डिझेल साठा नदीपात्रात कोणत्या माध्यमातून कशाप्रकारे आणि कुठून कसा पुरवला गेला याबाबत सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **रुपेशकुमार सुराणा**
> तहसीलदार, अमळनेर

> दिवस-रात्र बोटीद्वारे व जेसीबीच्या सहाय्याने डंपर भरून बेकायदेशीर वाळू उत्खनन सुरू असल्याबाबत १८ मे रोजी तक्रार करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. त्यानंतर पुन्हा स्मरणपत्र दिले.वाळू चोरीबाबत तक्रार असूनही कारवाई न झाल्यास प्रशासनाचे संगनमत असल्याचे स्पष्ट होईल. त्यामुळे वाळू वाहतुकीवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली ही तक्रार उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच महसूल मंत्र्यांकडे पाठविली यावर जिल्हाधिकारी ॲक्शन मोडवर आले.
>
> **ॲड. उमाकांत पाटील, सरपंच, धावडे**

> मी सावखेडा येथील रहिवासी असून अभियंता होतो. मात्र, अचानक पॅरालिसिस झाल्याने अपंगत्व आले असून सध्या घरीच आहे. गावात राहून नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतो. लोकांच्या विविध अडचणी व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतो. वाळू वाहतुकीबाबत अनेक वेळा आवाज उठवला.अनेक वेळा धमक्या देखील आल्या. मात्र मागे न हटता नदीपात्राचे अस्तित्व वाचवण्यासाठी १३ तक्रारी थेट मुख्यमंत्र्यांपासून महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत. तसेच काही लेखी तक्रारी स्थानिक प्रशासनालाही दिल्या आहेत. १३ मार्चपासून या तक्रारींची सुरुवात केली असून आता या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यात आली आहे.
>
> **लक्ष्मीकांत कदम (सामाजिक कार्यकर्ते - सावखेडा)**

## मनराज पाटील यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पाडसे (ता. अमळनेर) येथील रहिवासी व जळगाव जिल्ह्यातील वसंत सहकारी साखर कारखान्याचे माजी मेन्टेनन्स सुपरव्हायझर मनराज रामचंद्र पाटील ( वय ७४) यांचे शनिवार, दि. ३० मे रोजी दुपारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता पाडसे येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन बहिणी, दोन मुलगे, मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मंगळग्रह सेवा संस्थेच्या 'मंगल ध्वनी' या एफ.एम. रेडिओचे प्रतिनिधी तथा श्री मंगळग्रह मंदिराचे सेवेकरी अजय पाटील यांचे ते वडील होत.



## संपादकीय

# 'पाश्चात्त्य चष्मा' भारतीय वास्तव

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पत्रकारांचे प्रश्न स्वीकारण्यास किंवा पत्रकार परिषद घेण्यास नकार देतात, असे निरीक्षण नोंदविल्याने हॅले ल्युंग ही नॉर्वेजियन पत्रकार चर्चेत आली. तिच्या समाजमाध्यमांवरील 'पोस्ट'ना मिळालेल्या प्रतिसादामुळे पाश्चात्त्य माध्यमे, बुद्धिजीवी आणि भारताविषयी त्यांच्या दृष्टिकोनाची भूमिका पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. पंतप्रधान कार्यक्रम स्थळावरून बाहेर पडत असताना त्यांना हा प्रश्न विचारण्यात आला होता आणि त्यामुळे त्यांच्याकडून उत्तर मिळण्याची शक्यता कमी होती. नंतर भारताच्या परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ल्युंगने भारतातील मानवी हक्कांच्या पायमल्लीचा मुद्दा उपस्थित केला. समाजमाध्यमांवर याविषयी बरीच चर्चा झडली.भारताची बदनामी जाणीवपूर्वक केली जात असल्याचा आरोप ल्युंगवर करण्यात आला. तर ल्युंगने तिच्या संघर्षात्मक पत्रकारितेचे समर्थन करत सांगितले की, ती अशा देशातून आली आहे जो 'माध्यम स्वातंत्र्य निर्देशांका'त पहिल्या क्रमांकावर आहे.खरे तर ल्युंगने केलेले आरोप नवीन नाहीत. परंतु त्यावर भारतातून ज्या प्रतिक्रिया उमटल्या, जी उत्तरे दिली गेली, त्यात मूळ मुद्दाच लक्षात घेतलेला नाही, हे स्पष्ट होते.

हा मूळ मुद्दा दोन परस्पर संबंधित घटकांभोवती फिरतो: १) मानवाधिकारांकडे पाहण्याची दृष्टी आणि २) भारतातील इंग्रजी भाषेतील प्रसारमाध्यमे.युद्धोत्तर काळात विकसित झालेली आणि 'मानवाधिकार घोषणापत्रा'त समाविष्ट झालेली मानवी हक्कांची संकल्पना या गृहितकावर आधारित आहे की, राजकीय आणि नागरी अधिकार व स्वातंत्र्य हे जगातील मानवाधिकार, लोकशाही आणि सुशासनाचे मूलभूत आधार आहेत. या दृष्टिकोनामध्ये असे गृहित धरले जाते की, कोणत्याही देशात स्थिर आणि विकसित सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती असते. परंतु वसाहतवादोत्तर देश, जे काही प्रमाणात विकास साधण्यासाठी झगडत होते, ते वेगळ्याच समस्यांना सामोरे जात होते. त्यांच्यासाठी जनतेच्या सामाजिक–आर्थिक कल्याणाच्या गरजा अधिक महत्त्वाच्या होत्या. त्यामुळे त्यांनी मानवाधिकारांच्या संदर्भात अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य या गरजांची पूर्तता ही राजकीय व नागरीस्वातंत्र्य आणि अधिकारांपेक्षा प्राधान्याची असावी, अशी भूमिका घेतली. सुशासनाचा पाया म्हणून सामाजिक कल्याणकारी व्यवस्थेला मान्यता देणारी राज्यघटना मानवाधिकारांविषयीच्या या दृष्टिकोनावर विश्वास ठेवते. नेहरूवादी विकास प्रारूपाने यावर भर दिला; तसेच गरिबीविरोधी उपाययोजना, नव्वदच्या दशकात सुरू झालेल्या आर्थिक उदारीकरणाचे प्रयत्न आणि 'विकसित भारत' अजेंड्यांतर्गत सुरू असलेले प्रयत्नही याच भूमिकेला अनुसरून आहेत.दृष्टिकोनाचा प्रभावराजकीय आणि नागरी अधिकार व स्वातंत्र्य ग्रामपंचायतीपासून संसदपर्यंत सर्व स्तरांवर लागू असलेल्या प्रतिनिधिक व्यवस्थेद्वारे प्राप्त झाले आहेत. दुर्दैवाने, भारताने किंवा त्याच्या बुद्धिजीवी वर्गाने अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य यांना मूलभूत मानवाधिकार मानणाऱ्या आणि त्यानंतर राजकीय व नागरी स्वातंत्र्य व अधिकारांना स्थान देणाऱ्या या दृष्टिकोनाचे प्रभावीपणे प्रतिपादन आणि 'मार्केटिंग' केले नाही. भारतीय अभिजनवर्ग तसेच भारतीय बिगर–राज्य घटक अजूनही मानवाधिकारांविषयीच्या पाश्चात्त्य दृष्टिकोनालाच अंतिम मार्गदर्शक मानतात. विशेष म्हणजे, चीनने या विषयावर अधिक ठाम भूमिका घेतली असून भारतासारखाच दृष्टिकोन स्वीकारून पाश्चात्त्य दबावाला झुकण्यास नकार दिला आहे.लोकशाही आणि सुशासनाचा प्रश्न हा मानवाधिकारांच्या मांडणीशी निकट संबंधित आहे. भारतातील लोकशाही परंपरांविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या टिप्पणींकडे लक्ष देण्यासारखे आहे. घटनासभेतील चर्चेला उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते, "भारताला लोकशाही माहीत नव्हती असे नाही. एक काळ असा होता की, भारत प्रजासत्ताकांनी भरलेला होता, जिथे राजेशाही होती, तिथेही राजे निवडून दिलेले किंवा मर्यादित अधिकार असलेले असत. ते कधीही निरंकुश नव्हते. भारताला संसद किंवा संसदीय कार्यपद्धती माहीत नव्हती, असेही नाही. बौद्ध भिक्षू संघांच्या अभ्यासातून दिसून येते की तेथे संसद अस्तित्वात होती कारण संघ हे संसदेसारखेच होते आणि त्या संघांना आधुनिक काळातील संसदीय कार्यपद्धतीचे सर्व नियम माहिती होते आणि ते त्यांचे पालनही करत होते." दुसरीकडे, ज्या युरोपबाबत सर्वांत मुक्त माध्यमांचे कौतुक केले जात आहे, त्याबाबत अमेरिकेचे उपराष्ट्रपती व्हॅन्स यांनी युरोपियनांना आठवण करून दिली होती की, युरोपसमोरील धोका हा अंतर्गत आहे. युरोप आपल्या काही अत्यंत मूलभूत मूल्यांपासून माघार घेत आहे. त्यांच्या मते युरोपमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य मागे पडत आहे, युरोपियन सरकारांना लोकांच्या सरकारविरोधी मागण्यांची, मतांची भीती वाटत आहे.दुसरा मुद्दा म्हणजे परदेशी बुद्धिजीवी भारत समजून घेण्यासाठी कोणत्या स्रोतांचा वापर करतात आणि भारतीय माध्यमे समकालीन भारताचे चित्रण कसे करतात, हा आहे. भारताविषयी लिहिणाऱ्या आंतरराष्ट्रीय अभ्यासकांसाठी मुख्य स्रोत म्हणजे भारतातून प्रकाशित होणारी इंग्रजी भाषेतील प्रसारमाध्यमे आणि इंग्रजीत विविध माध्यमांवर प्रसिद्ध केली जाणारी भारतीय विद्वानांची मते. इंग्रजी माध्यमांचा प्रामुख्याने शहरी, मध्यम व उच्चवर्गीय, पाश्चात्त्य शिक्षण घेतलेला आणि उदारमतवादी दृष्टिकोन असलेला वाचकवर्ग आहे.

तसेच जागतिक स्पर्धात्मक जगात संधी मिळावी या विश्वासाने इंग्रजी शिक्षणाकडे पाहणारा महत्त्वाकांक्षी वर्गही आहे. परिणामी, ही माध्यमे भारतीय घडामोडी मांडताना पाश्चात्त्य उदारमतवादी दृष्टिकोन वापरतात. याउलट, प्रादेशिक भाषांतील माध्यमांना अशा वाचकवर्गाची पूर्तता करावी लागत नाही; त्यांना तळागाळातील घडामोडींमध्ये अधिक चांगला प्रवेश असल्यामुळे ती अधिक वास्तववादी माहिती देण्याची शक्यता असते. हीच माध्यमे भारताचे अधिक चांगले आकलन करून देतात; परंतु पाश्चात्त्य बुद्धिजीवी भारताचे विश्लेषण करताना या माध्यमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात. आज पाश्चात्त्य बुद्धिजीवी आणि माध्यमे भारतातील वास्तविक तळागाळातील वास्तव समजून घेण्यात अपयशी ठरतात आणि त्यातून हॅले ल्युंगसारखे पत्रकार आपली मते हीच वास्तवता आहे असे मानतात.ल्युंग किंवा इतर कोणताही पत्रकार समाजमाध्यमांवर खळबळ उडवू शकतो आणि भारतीय माध्यमेही त्यांच्या वैचारिक गरजेनुसार त्या टीकेला उचलून धरू शकतात; पण त्यामुळे भारतातील तळागाळातील वास्तवाचे प्रतिबिंब उमटणार नाही. भारतात अशा निवडणुका झाल्या आहेत; ज्यात ९० टयांहून अधिक मतदान झाले आणि लोकांनी भीतिविना मतदान केले. निवडणुका या राजकीय आणि नागरी अधिकार व स्वातंत्र्यांचे प्रतीक असल्या तरी खरी कल्याणकारी व्यवस्था, लोकशाही आणि खरे सुशासन हे सर्व जनतेला अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य उपलब्ध करून देण्यातूनच साध्य होणार आहे.आज पाश्चात्त्य बुद्धिजीवी आणि माध्यमे भारतातील तळागाळातील वास्तव समजून घेण्यात अपयशी ठरतात आणि त्यातून हॅले ल्युंगसारखे पत्रकार आपली मते हीच वास्तवता आहे असे मानतात.

# बहुसंख्य हिंदू असताना भारतात कुठे आहे 'पाकिस्तान'?

## जाणून घ्या या अनोख्या गावाचा इतिहास!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

देशात पाकिस्तान नावाचे गाव आहे हे वाचून अनेकांना धक्का बसला असेल. पण या राज्यात पाकिस्तान नावाचे गाव आहे. पाकिस्तानशी भारताचे हाडवैर जगजाहीर आहे. धर्माच्या नावावर पाकिस्तान भारतातून फाळणीनंतर स्वतंत्र झाला. तर भारतात या कट्टर हाडवैऱ्याचे नाव असलेले गाव आहे. विशेष म्हणजे या पाकिस्तान नावाच्या गावात मुस्लिम नाही तर हिंदू राहतात.

या गावाच्या नावावरून सातत्याने टीका होऊ लागल्यानंतर लोकांनी गावाच्या नावाची पाटी बदलली. पण प्रशासकीय स्तरावर या गावाची ओळख पाकिस्तान अशीच आहे.

बिहार राज्यातील पुर्णिया जिल्ह्यात श्रीनगर हा एक भाग आहे. त्यात सिंधीया ही पंचायत समिती आहे. पुर्णिया या शहरापासून ३० किलोमीटरवर सिंधीया आहे. त्यातंर्गत पाकिस्तान नावाचे गाव आहे. या गावात एकही मुस्लिम कुटुंब नसताना या गावाला पाकिस्तान हे नाव कसे पडले हा एक रोचक इतिहास आहे. हिंदू–मुस्लिमांमधील सद्भावाची झालर त्यामागे आहे. इथे हिंदू



आदिवासी राहतात.

१९४७ साली भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाली. तेव्हा भारतातील अनेक भागातून मुस्लिम कुटुंब पाकिस्तानमध्ये स्थलांतरीत झाले. बिहारमधील या गावातील मुस्लिम कुटुंब पूर्व पाकिस्तानात म्हणजे आजच्या बांगलादेशात स्थलांतरीत झाली. त्यांची आठवण म्हणून या गावातील हिंदूंनी गावाचे नाव पाकिस्तान असे ठेवल्याचे म्हटले जाते.भारत आणि पाकिस्तानमध्ये तीन युद्ध झाली आहेत. या युद्धानंतर या गावाचे नाव स्थानिकांना सातत्याने खटकत आले आहे.

या गावातील मुलांना लग्नासाठीही मोठी अडचण येऊ लागली. तर मुलींची लग्नी जुळवतानाही या नावामुळे मोठी अडचण येत होती. या आदिवासी पाड्याकडे प्रशासनाने कायम दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येतो. या गावाकडे जाण्याचा पक्का रस्ताही नसल्याने गावकरी नाराज होते. अखेर त्यांनी गावाचे नाव बदलण्याचे ठरवले. गावकऱ्यांनी पाकिस्तान नावाची पाटी काढली आणि बिरसानगर असे नाव दिले. या गावात संथाल आदिवासी राहतात.

या गावाचे नाव बिरसानगर असे करण्यात आले असले तरी अनेक गावकऱ्यांच्या आधार कार्डवर पाकिस्तान असेच नाव असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. गावकऱ्यांनी सरकार दरबारी पाकिस्तान ही ओळख पुसण्याची मागणी केली आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

## अमळनेर तालुक्यातील ६७ ग्रामपंचायतींमध्ये निवडणुकीची लगबग, जून–जुलैमध्ये प्रक्रिया पूर्ण होणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील ६७ ग्रामपंचायतींच्या आगामी निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने बिगर अनुसूचित व अंशतः अनुसूचित ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी यासंदर्भातील आदेश प्रसिद्ध केल्यानंतर तालुक्यात निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे.



आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार जून ते जुलै २०२६ या कालावधीत ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण निश्चितीची संपूर्ण प्रक्रिया पार पडणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच महिलांसाठीचे आरक्षण विशेष ग्रामसभांमधून सोडतीद्वारे निश्चित केले जाणार आहे.

आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभेची सूचना देण्याचा अंतिम दिनांक ८ जून २०२६ निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर १२ जून रोजी तहसीलदारांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा घेण्यात येणार असून त्यामध्ये आरक्षणाची सोडत काढण्यात येईल.यानंतर प्रभागनिहाय आरक्षणाच्या प्रारूप अधिसूचनेला १७ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता दिली जाणार आहे. १९ जून रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याच दिवसापासून हरकती व सूचना स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होईल.

नागरिकांना व इच्छुकांना २५ जून २०२६ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत.प्राप्त हरकतींवर उपविभागीय अधिकारी ३ जुलै २०२६ पर्यंत अभिप्राय सादर करणार आहेत. त्यानंतर अंतिम अधिसूचनेस ८ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता मिळेल. अंतिम प्रभाग रचना व आरक्षणाला १० जुलै २०२६ रोजी व्यापक प्रसिद्धी देण्यात येणार आहे.दरम्यान, आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर होताच ग्रामपंचायत निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी गावपातळीवर संपर्क वाढविण्यास सुरुवात केली आहे.

अनेक ठिकाणी संभाव्य प्रभाग रचना, आरक्षणाची शक्यता आणि राजकीय समीकरणांबाबत चर्चा रंगू लागल्या असून ग्रामीण भागातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे.

# आहार किती घ्यावा ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



सध्याच्या काळात आपण सगळेच आरोग्याप्रती सजग झालो आहोत. एवढेच काय, तर आपण काय खातो, किती खातो, कसे खातो यावर लक्ष ठेवणारे मोबाईल ॲप आपल्यावर नियंत्रण ठेवतात, दर अर्ध्या तासाने पाणी पिण्याची सूचना देतात. जेवणात किती कर्बोदके, प्रथिने असली पाहिजेत, याबाबत मार्गदर्शन करतात.

एकूणच आपला आहार मोजून मापून होऊ पाहत आहे. हे कमी म्हणून की काय, आपल्यावर सतत डाएट फूडच्या व्हिडिओचा समाज माध्यमातून मारा होत असतो. अशाने आहारशास्त्राबाबत आपण सावध होत आहोत की गोंधळत आहोत, अशी अवस्था निर्माण होते. याबाबत प्राचीन शास्त्र म्हणून ओळखले जाणारे आयुर्वेद म्हणते, उचित प्रमाणाहून कमी अन्न खाल्ले असता बल, पुष्टी व तेज उत्पन्न होत नाही व असे वागणे वातव्याधीस कारणीभूत होते. अति प्रमाणात घेतलेल्या आहाराने तर सर्वच दोषांचा प्रकोप होतो. अन्नापासूनच सर्व प्राणिमात्र उत्पन्न होतात व अन्नावरच त्यांचे जीवन अवलंबून असते. त्यामुळे योग्य अन्नाचे योग्य प्रमाणात सेवन करणे आवश्यक आहे. अतिरिक्त प्रमाणात उपास करून स्वतःची उपासमार करणे वा डाएटिंगच्या नावाखाली शरीराला क्लेश देणे योग्य नाही, त्याने त्रासच होतो. पण त्याच बरोबर अति प्रमाणात घेतलेला आहार अनेक प्रकारच्या रोगांना आमंत्रण करणारा ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या प्रकृतीनुसार या दोन्हीतला सुवर्णमध्य शोधणे आवश्यक असते.

पोटाचे चार भाग कल्पून त्यातील दोन भाग अन्नाने भरावेत. एक भाग पाण्याने भरावा व उरलेला चौथा भाग वायूंच्या संरक्षणासाठी मोकळा सोडावा. मात्र अल्पाहार किंवा उपोषण म्हणजे मिताहार नाही, हे लक्षात ठेवावे.आयुर्वेदाचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ रोगावर इलाज करत नाही, तर रोगाचे समूळ उच्चाटन करते किंवा रोग होऊच नये म्हणून तजवीज करते. त्यामुळे आहाराबाबत एकतर वैद्यकीय सल्ला घ्यावा किंवा आयुर्वेदाने दिलेल्या नियमांचे पालन करावे आणि ऐकीव माहितीनुसार शरीरावर कोणतेही प्रयोग करू नये, हे इष्ट.

# भूषण पवार व कल्पेश पाटील यांची स्पर्धा परीक्षेत उत्तुंग भरारी!

## पातोंडा परिसर विकास मंचतर्फे यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील 'पातोंडा परिसर विकास मंच' या संस्थेतर्फे स्पर्धा परीक्षा क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. पातोंडा परिसर विकास मंच यांच्या संकल्पनेतून दुमजली इमारत उभी राहिली असून परिसरातील अनेक विद्यार्थी येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतात. त्याचेच फलीत म्हणून आजपर्यंत ३५ विद्यार्थ्यांची विविध शासकीय पदावर निवड करण्यात आली आहे. त्यातच यावेळी येथील रहिवासी भूषण योजना विजय पवार यांची 'व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय' अंतर्गत मेकॅनिकल टेक्नॉलॉजी 'पूर्व निदेशक' पदावर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच कल्पेश सरलाबाई गोकुळ पाटील यांची तर अवघ्या २० व्या वर्षी एसआरपीएफ गट क्रमांक २० वरणगाव येथे ओबीसी प्रवर्गातून ६ व्या स्थानी निवड झाल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. आदिवासी विकास विभागाचे जॉईन्ट कमिशनर कपिल पवार (नाशिक) हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. श्री. पवार यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर यश मिळविल्याचे सांगून इतर विद्यार्थ्यांनीही प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.यावेळी विजयसिंह पवार, उमेश काटे , रेखा अशोक पाटील (उपशिक्षिका हातेड), निवृत्त प्राचार्य मगन सूर्यवंशी, नितीन विजय पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश पवार यांनी केले. तर आभार विलास चव्हाण सर यांनी केले. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी रिताताई बाविस्कर, अरुण दादा संदानशिव, शीतल महेंद्र पाटील तसेच ग्रामस्थ व विकास मंच चे सर्व विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले. परिसरातील नागरिक, विद्यार्थी व पालकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



*अमळनेर : येथील 'पातोंडा परिसर विकास मंच' या संस्थेतर्फे स्पर्धा परीक्षा क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार आदिवासी विकास विभागाचे जॉईन्ट कमिशनर कपिल पवार (नाशिक) यांच्या हस्ते करण्यात आला.*

# साखरपुड्याच्या मेकअपसाठी गेलेली तरुणी बेपत्ता

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : साखरपुडा असल्याने मेकअप करण्यासाठी गेलेली २१ वर्षीय तरुणी ब्युटी पार्लरमधूनच निघून गेल्याची घटना २८ रोजी घडली आहे.तालुक्यातील एका खेडेगावातील २१ वर्षीय तरुणीचा १ जून रोजी साखरपुडा असल्याने ती मेकअप करण्यासाठी २८ रोजी ११ वाजता चुलत भावासोबत अमळनेर शहरात सुरभी कॉलनीत स्वामीनी ब्युटी पार्लरमध्ये आली होती.




पार्लरमध्ये चार पाच तास लागणार होते. गावात लग्न असल्याने तरुणीला सोडून तिचा भाऊ लग्नाला निघून गेला.४ वाजता चुलत भाऊ सदर तरुणीला घेण्यासाठी गेला असता त्या ठिकाणी ती दिसून आली नाही. तिचा फोन ही बंद असल्याने नातेवाईकांना विचारून परिसरात शोध घेतला असता कोणताही तपास न लागल्याने तिच्या भावाने अमळनेर पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दिली आहे. पुढील तपास पोकॉ नितीन मनोरे हे करीत आहे.

# पुणेकर महिलेने बनविली शेणापासून चप्पल

## मोबाईलसाठीही बनविली खास चिप; महिन्याला एक लाखांची उलाढाल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

चक्क शेणापासून चप्पल तयार केली असून, मोबाईलचे तापमान कमी ठेवण्यासाठी एक विशेष चिपही बनवली आहे. या उत्पादनांना बाजारपेठात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

पुण्यातील नेहा अग्रवाल यांची गोशाळा असून त्यांनी दुग्धव्यवसायात उत्पन्न वाढविण्यासाठी गाईच्या शेणापासून आणि गोमूत्रापासून विविध प्रकारची उत्पादने तयार केली आहेत. त्यांनी चक्क शेणापासून चप्पल तयार केली असून, मोबाईलचे तापमान कमी ठेवण्यासाठी एक विशेष चिपही बनविली आहे. या उत्पादनांना बाजारपेठात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.



नेहा अग्रवाल यांनी सांगितले, की त्यांच्या गोशाळेत ३० हून अधिक गायी असून दुधापासून विविध दुग्धजन्य पदार्थ तयार केले जातात. तसेच शेण आणि गोमूत्राचा उपयोग करून विविध उत्पादने बनविली जातात. यामध्ये शेणापासून तयार केलेल्या चपलांचाही समावेश असून, त्या शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करत असल्याचे त्यांनी सांगितले.

गाईच्या शेणापासून एक विशेष चिप तयार करण्यात आली असून ती मोबाईलला लावल्यानंतर मोबाईलचे तापमान कमी राहण्यास मदत होते. तसेच शेणापासून आसनासह इतर अनेक उत्पादने तयार करण्यात आली असून, या सर्व उत्पादनांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे नेहा यांनी सांगितले.

गाईच्या शेणापासून आणि गोमूत्रापासून तयार करण्यात येणाऱ्या विविध उत्पादनांमधून त्यांना महिन्याला तब्बल एक लाखाची उलाढाल होते. त्यांनी तयार केलेल्या शेणाच्या चपलांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असून, आरोग्याच्या दृष्टीनेही या चप्पल फायदेशीर असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# लोककल्याणकारी राज्यकर्ती आणि आदर्श समाजसेविका

जन्मदिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे-राण्यांनी आपल्या कार्याचा अमिट ठसा उमटविला आहे. त्यामध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. न्यायप्रियता, लोकाभिमुख प्रशासन, धर्मकार्यातील योगदान आणि जनकल्याणासाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे त्यांना 'पुण्यश्लोक' ही उपाधी लाभली. त्यांचा रविवार, दि. ३१ मे रोजी जन्मदिन. यानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आणि आदर्श शासनपद्धतीचा आढावा घेणे प्रेरणादायी ठरते.

### जन्म आणि प्रारंभिक जीवन

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चोंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते; मात्र माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण दिले आणि धार्मिक व सामाजिक संस्कारही घडविले. एका प्रसंगी मल्हारराव होळकर यांनी लहान वयातील अहिल्याबाईंची बुद्धिमत्ता आणि विनम्रता पाहून त्यांचा विवाह आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी लावून दिला. विवाहानंतर त्या होळकर घराण्यात दाखल झाल्या आणि पुढे त्यांनी राज्यकारभाराची बारकाईने माहिती मिळविली.

### संघर्षातून घडलेले नेतृत्व

इ.स. १७५४ मध्ये खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर काही वर्षांतच मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. या वैयक्तिक दुःखांवर मात करत अहिल्याबाईंनी राज्याची जबाबदारी स्वीकारली. इ.स. १७६७ पासून त्यांनी होळकर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने सांभाळला. त्यांनी आपली राजधानी महेश्वर येथे स्थापन केली. त्यांच्या शासनकाळात राज्यात शांतता, सुव्यवस्था आणि आर्थिक समृद्धी नांदली.



### लोकाभिमुख प्रशासन

अहिल्याबाईंच्या प्रशासनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे न्यायनिष्ठा. प्रजेच्या तक्रारी त्या स्वतः ऐकत आणि तत्काळ न्याय देत. त्यांच्या दरबारात सामान्य नागरिकांनाही आपली बाजू मांडण्याची संधी मिळत असे. त्यांनी करप्रणाली सुलभ केली, शेतकऱ्यांना संरक्षण दिले आणि दुष्काळ किंवा संकटाच्या काळात मदतीचे विविध उपक्रम राबविले. त्यामुळे प्रजेचा त्यांच्यावर अपार विश्वास होता. राज्यकर्ती म्हणून त्यांनी सत्तेचा वापर लोककल्याणासाठी कसा करावा याचा आदर्श निर्माण केला.

### वैशिष्ट्यपूर्ण कार्य आणि समाजसेवा

अहिल्याबाई होळकर यांचे कार्य केवळ राज्यकारभारापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण भारतभर अनेक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकासकामे केली.

**१) मंदिरांचे पुनर्निर्माण आणि जीर्णोद्धार**

परकीय आक्रमणांमुळे उद्ध्वस्त झालेल्या अनेक मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. विशेषतः काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर, गया मंदिर संकुल यांसारख्या अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासात त्यांचे मोठे योगदान आहे.

**२) घाट, विहिरी आणि धर्मशाळा**

देशभरातील यात्रेकरूंच्या सोयीसाठी त्यांनी अनेक घाट, विहिरी, तलाव आणि धर्मशाळा उभारल्या. प्रवाशांना निवारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यामागे त्यांची लोकसेवेची भावना दिसून येते.

**३) महिला सक्षमीकरण**

त्या काळात स्त्रियांना समाजात मर्यादित स्थान होते. अशा परिस्थितीत एका महिलेनं सक्षम राज्यकर्ती म्हणून यशस्वी नेतृत्व करून स्त्रीशक्तीचा आदर्श घालून दिला. त्यांनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सामाजिक सहभागासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले.

**४) व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन**

महेश्वर हे शहर त्यांनी व्यापार आणि हस्तकलेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनविले. त्यांच्या आश्रयामुळे प्रसिद्ध महेश्वरी साडी उद्योगाला चालना मिळाली. त्यामुळे स्थानिक कारागिरांना रोजगार उपलब्ध झाला आणि आर्थिक विकासाला गती मिळाली.

### सांस्कृतिक आणि धार्मिक एकात्मतेचा संदेश

अहिल्याबाईंच्या कार्यात सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते. त्यांनी देशाच्या विविध भागांतील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी मदत केली. त्यांच्या कार्यामुळे भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन झाले आणि विविध प्रदेशांमध्ये सांस्कृतिक बंध अधिक दृढ झाले.

### आजच्या काळातील प्रेरणा

आजच्या प्रशासनव्यवस्थेसाठी अहिल्याबाईंचे जीवन आदर्श मानले जाते. पारदर्शक शासन, लोककेंद्रित निर्णय, सामाजिक बांधिलकी, स्त्री नेतृत्व आणि सांस्कृतिक जतन यांसारख्या मूल्यांची त्यांनी प्रभावी अंमलबजावणी केली. म्हणूनच त्यांचे नाव भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ महिला राज्यकर्त्यांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या जनतेच्या सुख-दुःखाशी एकरूप झालेल्या लोकमाता होत्या. न्याय, सेवा, धर्मनिष्ठा आणि लोककल्याण या मूल्यांवर आधारित त्यांचे जीवन आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे सुशासन, सामाजिक समता आणि राष्ट्रसेवेच्या आदर्शांना अभिवादन करण्यासारखे आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या या महान विभूतीस विनम्र अभिवादन..!

# दररोज दही-भात खाल्ल्यास शरीरात होणार मोठा बदल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दही आणि भात हे असे मिश्रण आहे जे तुमच्या पोटासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. हे अन्न शतकानुशतके खाल्ले जात आहे. सहज उपलब्ध होणारा साधा, सात्विक आहार म्हणजे दही भात. अगदी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक दही भात खाणं पसंत करतात. हल्ली सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अनेक रील्समुळे दही भाताबद्दलचे अनेक फायदे वाचून लोक आवर्जून दही भाताचे सेवन करू लागले आहेत. विशेषतः या पदार्थाचे सेवन उन्हाळ्याच्या दिवसात करणं अधिक फायदेशीर मानलं जातं. उन्हाळ्यातील उष्ण हवामानामुळे आरोग्यावर अनेक गंभीर परिणाम दिसू लागतात. उन्हाळ्यात अनेकांना पोटात जळजळ होते. अशा हवामानात, आपण सर्वजण असे पदार्थ सेवन करणं पसंत करतो जे पचण्यासाठी आरामदायी, थंड आणि हलके असतील. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आहारात दही आणि भाताला सहभागी करू शकता. दही आणि भात हे असे मिश्रण आहे जे तुमच्या पोटासाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. हे अन्न शतकानुशतके खाल्ले जात आहे.

### उन्हाळ्याच्या दिवसांत दही-भात खाण्याचे फायदे

दही आणि भात खाल्ल्याने पोट थंड होते. ज्यामुळे शरीरातील उष्णता शांत होते.

### चयापचय

त्याचे सेवन आपली चयापचय गती वाढवण्यासाठी तसेच आपल्या आतड्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते.

दही भात पोटासाठी खूप फायदेशीर मानला जातो. यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स आतडे निरोगी ठेवतात आणि गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्यांपासून आराम देतात. हे कमी कॅलरीयुक्त अन्न संयोजन आहे. जे तुम्ही तुमच्या आहारात समाविष्ट करू शकता. जे तुमचे वजन कमी करण्यासदेखील मदत करू शकते.

### डीहायड्रेशन

या मिश्रणाचे सेवन केल्याने डिहायड्रेशन रोखण्यास फायदा होऊ शकतो. त्यातील घटक इलेक्ट्रोलाइट्स म्हणून काम करतात आणि शरीराला ऊर्जा प्रदान करतात.

### प्रथिन

दही आणि भात दोन्हीमध्ये प्रथिने चांगल्या प्रमाणात असतात. हे शरीरातील स्नायूंची दुरुस्ती, वाढ आणि पेशींची देखभाल करण्यास मदत करतात. व्यायामानंतरचे दहीभात खाणे खूप चांगले फायदे देऊ शकते.

### रक्तातील साखर कमी

दही-भातामध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, म्हणेच ते रक्तातील साखरेचे पातळी स्थिर ठेवण्यास मदत करते. मधुमेहाने ग्रस्त असलेल्या हा एक उत्तम पर्याय असू शकतो.

### आतडी मजबूत

दही-भात आतड्यांसाठी मायक्रोबायम मजबूत करतात, ज्यामुळे एकूण आरोग्य सुधारते.

# डॉक्टरी छोड़ सिर्फ २ महीने तैयारी कर पास किया यूपीएससी, आयएएस बन तनु जैन ने रचा इतिहास

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कहते हैं कि मेहनत करने वालों की कभी भी हार नहीं होती है। जो मेहनत करना जानते है वो एक न एक दिन इतिहास जरूर रचते है। आज हम आपको जिनकी कहानी बताने वाले है उन्होंने सिर्फ २ महीने की तैयारी में ही ऐसा इतिहास रचा दिया है जिसे तोड़ पान हर किसी के बस की बात नहीं है।

आज हम जिनकी बात करने जा रहें है सिर्फ २ महीने की तैयारी में ही यूपीएससी पास कर ली इनका नाम तनु जैन हैं। वर्तमान में तनु जैन डीआरडीओ में सहायक निदेशक के रूप में कार्यरत हैं और दृष्टि आयएएस में मॉक इंटरव्यू लेती हैं।



आयएएस तनु जैन ने साल २०१२ में यूपीएससी की परीक्षा दी थी लेकिन तब उन्हें सफलता नहीं मिल सकी थी। दो साल बाद साल २०१४ में तनु जैन ने अपने तीसरे प्रयास में यूपीएससी की परीक्षा को पास कर दिया। उनकी पहली पोस्टिंग साल २०१५ में सशस्त्र बल मुख्यालय सेवा में हुई।

जानकारी के अनुसार तनु जैन ने सुभारती मेडिकल कॉलेज, मेरठ से बैचलर ऑफ डेंटल सर्जरी (बीडीएस) की डिग्री ली। जब उन्हें इस काम में बहुत मन नहीं लगा तो उन्होंने यूपीएससी की परीक्षा देने का फैसला किया।

उन्होंने अपने पहले प्रयास में सिर्फ २ महीने की तैयारी में यूपीएससी प्रीलिम्स परीक्षा पास कर ली थी। मेन्स की परीक्षा में उन्हें सफलता नहीं मिली। लेकिन साल २०१४ में अपने तीसरे प्रयास में उन्होंने ६४८वीं रैंक हासिल की। तनु जैन सोशल मीडिया प्लेटफॉर्म इन्स्टाग्राम पर भी काफी सक्रिय हैं।

# लातूरची फेमस रिलस्टार तरुणी निघाली चोर; हजारो फॉलोअर्स कोमात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इन्स्टाग्रामवर लाईक मिळविण्यासाठी तरुण आणि तरुणी काय करतील याचा नेम नाही. पण एका लाईकबाज रिलस्टार तरुणीचा प्रताप पाहून पोलिसांनीही डोक्याला हात लावला. दिवसभर रिल बनवून लाईक मिळविणारी तरुणी चक्क चोरी करत होती. इन्स्टाग्रामवर रिल्स आणि व्हिडिओमुळे चर्चेत असलेल्या लातूरच्या एका तरुणीला वायर चोरीप्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार लातूरच्या एमआयडीसी परिसरात या रिलस्टार तरुणीने चोरी केल्याचे उघड झाले आहे. प्रियांका जितेंद्र कांबळे असे या तरुणीचे नाव असून ती सोशल मीडियावर विविध व्हिडिओ आणि रिल्समुळे चर्चेत असते. तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर तब्बल ३२ हजार फॉलोअर्स आहेत. लातूरच्या एमआयडीसी परिसरात सुरू एका ठिकाणी इमारतीचे बांधकाम सुरू होते. बांधकामावरील ४१ हजार रुपये किमतीच्या घरगुती लाईट फिटिंगसाठी वापरण्यात येणारी वायर चोरी करताना ही रिलस्टार प्रियांका कांबळे सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या प्रकरणी लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेने तिचा शोध घेत कारवाई केली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेकडून केलेल्या तपासामध्ये ही तरुणी सीसीटीव्ही फुटेजमध्ये वायर चोरी करत असल्याचे स्पष्ट दिसून आले. इन्स्टाग्रामावर रिल्स बनविणारी आणि मोठ्या प्रमाणात फॉलोअर्स असलेल्या या रिलस्टार चक्क वायर चोरीत पुढे आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तिला ताब्यात घेत एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन केले. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.










# भगवान सूर्यनारायण यांची विविध फलदायी सूर्योपासना!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सूर्योपासना हा भारतवर्षाचा प्राण आहे. आपल्या ऋषी-मुनींनी साधना करून सूर्योपासनेचे लाभ मिळविलेले आहेत. भगवान सूर्यनारायण यांच्याविषयीची सखोल, शास्त्रशुद्ध आणि आध्यात्मिक माहिती पुढीलप्रमाणे-

**१) भगवान सूर्यनारायण धर्मपरायण**

पृथ्वीवरील मनुष्यप्राण्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसणारे देव म्हणजेच भगवान सूर्यनारायण होय. पृथ्वीवरील सर्व जीवांचे एकमेव आधार असणाऱ्या सूर्यनारायण यांच्या निवासस्थानास सूर्यलोक असे म्हणतात. आपण सर्वांनीच सूर्य देवतेचा आदर्श घेण्यासारखा आहे. कारण सूर्यदेव आपले नित्यक्रम (धर्माचरण) कधीच पालटत नाही.

सूर्यनारायण या विशेषणाने त्यांचा सन्मान धर्मलोकातूनही केला जातो. सूर्य जसे नारायण आहेत तसेच ते धर्मपरायणही आहेत. म्हणूनच आदर्श असावा, तर केवळ या सूर्याचाच! सूर्यदेव हा आपल्या हिंदू संस्कृतीचे प्राण आहेत. इतरत्रची कुठलीही संस्कृती आणि आपली सनातन संस्कृती यात हाच एक फार मोठा फरक आहे. सूर्यदेव हे पंचांगाचा आधारात्मा आहेत.

**२) सूर्य हे ब्रह्मांडेचा नियंत्रक**

भारतवर्षातील ऋषीमुनी, सिद्ध महात्मे आणि संत यांनी सूर्योपासनेचा दंडक घालून दिलेला आहे. सूर्य हे सर्वांत तेजस्वी, सामर्थ्यवान, युक्तीवान, बुद्धीवान आणि सर्वज्ञ असे सृष्टीचे जगत्चालक असून, ते संपूर्ण ब्रह्मांडाचे नियंत्रक आहेत. त्यांच्या उगवण्याने संपूर्ण सृष्टी आपोआपच जागृत होऊन पिवळ्या चैतन्याने न्हाऊन निघते; म्हणूनच सूर्यास्तानंतर घराघरातून तुळशीपाशी दिवे लावले जातात. सूर्य आपले तेज आणि शक्ती सायंकाळी देवाजवळच्या दिव्याला देऊन जातात म्हणून देवापाशी दिवा लावावा. सर्व हिंदूंचा दिवस सूर्योदयापासून चालू होतो आणि संपतोही सूर्यास्तानंतरच. म्हणून आपल्या भारतवर्षातील ऋषी-मुनी, सिद्ध महात्मे अन् संत यांनी सूर्योपासनेचा दंडक घालून दिलेला आहे.

**३) सर्वांचा उद्धार कसा करावा? याचे शिक्षण देणारे आदर्श शिक्षक**

पृथ्वीवरील हवा, पाणी, अग्नी, तेज, उष्णता, शुद्धता, स्वच्छता आणि पवित्रता यांचा उगमस्रोत सूर्यच आहेत. त्यामुळे प्रतिदिन या सर्व घटकांच्या संयुक्त प्रक्रियेद्वारे वातावरण सूर्यकिरणांतून शुद्ध होत जाऊन जीवसृष्टीचे संरक्षण होण्यासाठी सहाय्य होत आहे. हे कार्य घडवून आणण्याचे अखंडत्व सूर्यदेवांनी जोपासून ठेवले आहे; म्हणूनच जोपासना कशी करावी? हे मर्म सूर्योपासनेतूनच शिकून पृथ्वीवर आम्हा सर्वांचाच उद्धार कसा करावा? याचे शिक्षण देणारे खरे आदर्श शिक्षक सूर्यनारायण ठरतात.



**४) सूर्यदेवांची आध्यात्मिक वैशिष्ट्ये**

**कर्तव्यपरायणता :** सूर्य मानवी शरीराला अंतर्यामी प्रेरणा देत असल्याने सर्वांनाच जागे होण्याचा संदेश देऊन आपली कर्तव्यपरायणता सिद्ध करत असल्याने सूर्यदेव म्हणून त्यांची अतिशय आदराने पूजा केली जाते.

**आत्मशक्तीचे आध्यात्मिक प्रेरक :** विज्ञानवादी सूर्यदेवतेला जरी एक तप्त गोळा समजत असले, तरी खऱ्या अर्थाने सूर्य आत्मशक्तीचे आध्यात्मिक प्रेरक आहेत.

**नम्रता :** सूर्यकिरणे सर्वांनाच नमस्काराची प्रेरणा देतात. त्यामुळे एकमेकांना राम, राम, नमस्कार, अशा शब्दांच्या भावफुलांनी सकाळ गजबजून गेलेली दिसून येते.

**सूर्यदेव महान :** सूर्यदेवता महान असूनही त्यांचे किरण पृथ्वीवरील क्षुद्र जीवजंतू आणि मनुष्याचे चरण यांना स्पर्श करून आपल्या सर्वांनाच नम्रतेची शिकवण देत प्रेरित करत असतात.

**आज्ञापालन, शरणागती आणि तत्परता :** सूर्यनारायण प्रारंभ केलेले आणि अपूर्ण राहिलेले कर्म जसेच्या तसे मागे टाकून अस्ताचलास जातात. त्यांच्या या कृतीतून आज्ञापालन आणि शरणागती कशी असावी? वर्तमानकाळात कसे सतत राहावे, हे शिकावयास मिळते. तसेच यातून तत्परता हा गुण मानवाने घ्यावा, असेच ते सुचवत असतात.

**निरपेक्षता आणि अनासक्ती :** सूर्य कर्मपूर्तीची अपेक्षा किंवा प्रतीक्षा कधीच करत नाहीत. त्यांना कर्मासक्ती आणि फलासक्ती उरत नाही. सूर्य आपली सर्व किरणे क्षणात आवरून टाकतात. मोठमोठ्यांनाही हे कधीही जमणे शक्य नाही. हीच सूर्यनारायणांची असामान्यता आहे.

**सूर्याभ्दवन्ति भूतानि सूर्येण पालितानि तु ।**
**सूर्ये लयं प्राप्नुवन्ति यः सूर्यः सोऽहमेव च ॥ -- सूर्योपनिषद्**

**अर्थ :** सूर्यदेवतेपासून प्राणीमात्रांची निर्मिती होते. त्यांच्या कृपेमुळेच त्यांचे पालनपोषण होते आणि त्याच्यातच सर्वांचा लय होतो. असा सूर्य मीच आहे, असे ईश्वर म्हणतात.

**सर्वदेवमय :** संपूर्ण भुवनातील प्रकाशमान, तेजस्वी देवता म्हणून सूर्यदेवांची ओळख असली, तरी सूर्य हे सर्वदेवमय असेच आहेत. ब्रह्मा, विष्णू, महेश, स्कंद, प्रजापती, महेंद्र, वरुण, काल, यम, सोम आदी तेच आहेत. सूर्यदेवतेच्या मित्र या नावातील देवता ही दिवसभराची, तर वरुणनामक देवता ही रात्रीची आहे; म्हणूनच सूर्यास्त होऊन रात्र चालू होताच तमोगुणरूपी झोप अनावर होते. अहंकाराची देवता हीसुद्धा रात्रच असल्यामुळे रात्रीला पृथ्वीवर भयंकर असे उत्पात घडून येतात. देवतास्वरूप सूर्यनारायण भगवान शंकराच्या आज्ञेने प्रतिदिन भ्रमण करत असतात.

सूर्यदेवतेचे स्थूल, सूक्ष्म आणि आध्यात्मिक स्वरूप

सूर्यदेवतेचे स्थूल रूप म्हणजे सूर्यमंडळ. सूक्ष्म रूप म्हणजे तदन्तर्यामीपुरुष, तर आध्यात्मिक स्वरूप म्हणजे आपल्या डोळ्यांतील ज्योती (नेत्रज्योती) होय.

**आयुर्दान करणे :** संपूर्ण भुवनातील सर्वांनाच सूर्यदेव आयुर्दान करतात; म्हणूनही सूर्यदेवांना आदित्य सूर्यनारायण असे म्हणतात.

**ब्रह्मांडातील सर्व ज्ञान सूर्यदेवांकडे असणे :** ब्रह्मांडातील सर्वच्या सर्व ज्ञान एकट्या सूर्यदेवांजवळच उपलब्ध आहे. हनुमंतजींनीही हे संपूर्ण ज्ञान सूर्यदेवांकडूनच प्राप्त करून घेतले होते; म्हणून बालपणी हनुमंतजींनी सूर्यदेवांकडे झेप घेतल्याचा प्रसंग आला.

**कर्मठ आणि कर्मकुशल :** सूर्य अखंड कार्यरत असून ते फारच कर्मठ आणि कर्मकुशल असल्याने त्यांच्याकडून योगः कर्मसु कौशलम् । म्हणजे समत्वरूपी योग साधणे, हेच कर्मातील कौशल्य आहे, हे तत्त्व उदयास आले आहे. सूर्यदेवांची हीच शिकवण मानवासाठी आहे.

**तेजोमय :** सूर्यदेव धर्माच्या आणि कर्तव्याच्या मार्गाने सतत चालत असल्याने त्यांचे तेज कधीच लोप पावत नाही. त्यांची कांती (शरीर) तप्त सुवर्णाप्रमाणे आहे. म्हणूनच त्यांच्या किरणांना सोनेरी किरण असे म्हटले जाते.

**विश्वाचे साक्षीदेव :** हेच सूर्यदेव १४ भुवनांचे पालक आहेत. तसेच ते विश्वाचे साक्षीदेव म्हणूनही कार्यरत आहेत.

**सर्व देवांचे नियामक :** सूर्यदेवांचे सर्वांत मोठे गुण म्हणजे त्यांना आळस कधीच स्पर्श करू शकत नाही. सूर्यदेव इतर सर्व देवांचे नियामक आहेत.

**चराचर सृष्टीचे आत्मा :** सृष्टीतील सर्व आकार आणि रंग सूर्यदेवांमुळेच निर्माण झाले आहेत. सूर्यदेवांसारखी जीवनशक्ती विश्वात अन्य दुसरी कोणतीही नाही. सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च । म्हणजे सूर्य हा चराचर सृष्टीचा आत्मा आहे, असे त्यांचे वर्णन आहे.

**विराट पुरुषाचे नेत्र :** जगातील सर्व कर्मे, व्यवहार सूर्यदेवांच्या दृष्टीतून सुटूच शकत नाहीत. सूर्यदेव विराट पुरुषाचे नेत्र असून अंतराळाचा अलंकार आहेत. सूर्यदेवांचा प्रकाश जणू काही अमूर्त अशा अग्निदेवतेचे मुख आहे.

**दुपारी १२ वाजता अहंकाराची आठवण :** सूर्यदेवांना दुपारी १२ वाजता आपल्या अहंकाराची आठवण होतेच; पण त्यांचा अहंकार काही क्षणातच नष्ट होऊन त्यांची खाली वाटचाल चालू होते. सूर्यदेवांचे चरण नेहमीच झाकलेले असतात. सूर्यदेवांच्या तेजापासूनच विश्वकर्म्याने सुदर्शनचक्र निर्माण केले आहे. सूर्यदेवांना कान असल्याने ते आपली प्रार्थना ऐकू शकतात.

**५) सूर्यदेवांचे १२ अवतार**

सूर्यदेवांचे १२ अवतार आहेत. इंद्र, धाता, त्वष्टा, पूषा, अर्यमा, भग, विवस्वान, विष्णू, अंशुमान, वरुण, मित्र आणि पर्जन्य अशी बारा रूपे आपल्याला दिसतात.

**६) सूर्यदेवांची उपासना**

सूर्यदेवांना लाल कण्हेरीचे फूल वाहावे. सूर्यपूजनात जाईचे फूल श्रेष्ठ आहे. सूर्यदेवांना मोदकांचा नैवेद्य दाखवावा.

**७) सूर्योपासनेमुळे होणारे लाभ**

**आरोग्य उत्तम राहणे :** आरोग्यं भास्करात् इच्छेत् । म्हणजे सूर्यदेवांकडून आरोग्याची इच्छा करावी, म्हणजेच सूर्योपासना करून आरोग्य मिळवावे, असे वचन आहे. अन्य देवांच्या उपासनेचा आधार केवळ सूर्योपासना हाच आहे; म्हणूनच ज्याला चांगले आरोग्य पाहिजे त्याने सूर्योदयापूर्वीच उठून अंघोळ करून उगवत्या सूर्यदेवांना अर्घ्य देऊन प्रतिदिन नमस्कार करण्याचा निर्धार केल्यास त्या व्यक्तीचे आरोग्य उत्तम रहाते.

**विजय प्राप्त होणे :** सूर्योपासनेमुळे सर्व विषयांत, व्यापारात, उद्योगधंद्यात जयप्राप्ती होते. अन्य उपासनांपेक्षा सूर्योपासना जलद फलप्राप्ती करून देणारी आहे. सूर्योपासनेमुळे सर्वज्ञता प्राप्त करून घेता येते. प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्रांनीही रावणासमवेतचे युद्ध जिंकण्यासाठी अगस्ती ऋषींच्या सांगण्यावरून आदित्यहृदय स्तोत्राचे पठण केल्यानंतरच विजय मिळविला.

# अधिक मासामध्ये जावयाचीच पूजा का करतात?

## जावयालाच वाण देण्यामागचे कारण नेमके काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू धर्म आणि ज्योतिषशास्त्रात अधिक मासाला मोठे महत्त्व आहे. २०२६ वर्षात अधिक मास १७ मे रोजी सुरू झाला आहे. धार्मिक आणि ज्योतिषशास्त्रानुसार पाहायला गेले तर विश्वाचे रक्षक भगवान विष्णूला समर्पित हा महिना आहे. अधिक मासाला 'मलमास' म्हटले गेल्यामुळे तो त्याज्य होता आणि नंतर भगवान विष्णूंनी त्याचा अंगीकार केला म्हणून 'पुरुषोत्तम मास' याला म्हटले जाऊ लागले. यामध्ये भगवान विष्णूंची पूजा केली जाते. याच संदर्भात अधिक माहिती आपण संदर्भाने जाणून घेऊया.



**'पुरुषोत्तम मास' का म्हणतात?**

असे मानले जाते, की अधिक मासाला कोणताही स्वामी नव्हता. त्यामुळे तो उपेक्षित ठरला. तेव्हा भगवान विष्णूंनी या महिन्याला आपले 'पुरुषोत्तम' नाव दिले आणि या महिन्याचे स्वामीत्व स्वीकारले. म्हणूनच या काळात विष्णूची उपासना अत्यंत फलदायी मानली जाते. यामध्ये आपला अवतीभोवती असलेले भगवान विष्णूंचे प्रत्यक्ष रूप कोण आहेत, तर ज्यावेळेला आपण आपल्या मुलीचा विवाह करतो. विवाह करताना कन्यादान असा विधी आपण करतो.

या कन्यादानामध्ये आपण असा संकल्प करत असतो, की विष्णू स्वरूपिन वराय, श्री रुपिणी इमाम कन्या... याचाच अर्थ असा होतो, की माझी मुलगी ही लक्ष्मीस्वरूप आहे. ती विष्णूस्वरूप असणाऱ्या या माझ्या जावयाला मी देतोय. अर्थात आपले जावई हे प्रत्यक्ष विष्णूस्वरूप आपल्यासाठी असतात. म्हणून त्यांची पूजा केल्यानंतर आपल्याला भगवान विष्णूंची पूजा केल्याचे पुण्य प्रत्यक्ष मिळत असते. अशा वेळी ३३ अशा गोष्टी, पदार्थ ज्याला छिद्र आहेत. उदा.- अनारसे, बत्तासे इत्यादी अशा सछिद्र असलेल्या अशा ३३ गोष्टींचे दान आपल्याला जावयाला या अधिक महिन्यात द्यायचे असते.

# अधिक महिन्यातील पौर्णिमेस निर्माण होतोय दुर्मिळ योग

## पैशाची कडकी कमी करण्यासाठी करा हा उपाय





ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हिंदू दिनदर्शिकेनुसार अधिक महिना तीन वर्षांतून एकदा येतो. हा महिना भगवान विष्णूंचा प्रिय महिना म्हणून मानला जातो. या महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला माता लक्ष्मी व नारायण यांची पूजा करण्याने सामान्य दिवसांपेक्षा जास्त पटीने अधिक फळ मिळते. जर तुमच्या घरात पैसा टिकत नसेल, वायफळ खर्च होत असेल तर या दिवशी केले गेलेले उपाय थेट माता लक्ष्मींची कृपादृष्टी मिळवून देतात, अशी मान्यता आहे.

**हे महासंयोग होत आहेत तयार**

३१ मे २०२६ रोजी अधिक महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी रवी योग निर्माण होत आहे. या योग सर्व प्रकारचे दोष नष्ट करतो. हा योग यश देणारा योग मानला गेला आहे. तसेच या दिवशी चंद्र आणि गुरू शुभ स्थितीमुळे इतर लाभकारी योग देखील तयार होत आहेत.

**कोणते उपाय करावेत?**

गंगाजल मिश्रीत तांब्याच्या तांब्यातील पाणी मुख्य दारावर शिंपडा

१) अधिक महिन्यातील पौर्णिमेस सकाळी लवकर उठून स्नान करून एका तांब्याच्या तांब्यात शुद्ध पाणी घ्या. त्यात थोडे गंगाजल, चिमटभर हळद मिसळा. हे पाणी आपल्या घराच्या मुख्य द्वारावर शिंपडा. त्यानंतर हळदीने स्वस्तिक काढा. यामुळे राहू दोष आणि नकारात्मक ऊर्जा दूर जाते.

**२) पिंपळाच्या झाडाला गोड पाणी आणि दिवा**

पौर्णिमेच्या सकाळी पिंपळाच्या झाडाला जल अर्पित करणे अत्यंत शुभ मानले गेले आहे. या खास पौर्णिमेला थोडे पाणी, दूध आणि साखर किंवा गूळ मिसळून पिंपळाच्या मुळाला अर्पण करावे. यानंतर सायंकाळी पिंपळाच्या झाडाजवळ एक तुपाचा दिवा लावा. ज्योतिषशास्त्रानुसार पिंपळाच्या झाडात माता लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांचा वास असतो. यामुळे घरातील पैशाची चणचण दूर होते.

**३) लक्ष्मीला कवड्या अर्पण**

सायंकाळी घरातील देव्हाऱ्यात माता लक्ष्मींची विधिवत पूजा करावी. पूजेवेळी माता लक्ष्मी यांना ११ पिवळे कवडे आणि मखान्याचा नैवेद्य दाखवावा. पूजा झाल्यावर या कवड्या एका लाल कपड्यात बांधून आपल्या तिजोरीत पैसे ठेवण्याच्या जागेवर ठेवावे. हा उपाय तुमचा बँक बॅलेन्स वेगाने वाढवितो.

**४) चंद्राला अर्घ्य**

पौर्णिमेचा थेट संबंध हा चंद्राशी असतो. त्यामुळे रात्री चंद्र उगवल्यानंतर त्याला अर्घ्य द्या. एका तांब्यात पाणी थोडे कच्चे दूध, अक्षता आणि पांढरे फूल टाकून चंद्र देवाला अर्घ्य द्याऊन ओम सों सोमाय नमः असा मंत्रजप करावा. यामुळे मानसिक तणाव दूर होतो.

# 'बळकट धरा भाव, तुम्हापाशी आहे देव'

## मना सज्जना...



परम स्नेही मित्रहो...
समर्थ सद्गुरूंचे स्मरण आणि प्रभू श्रीरामचंद्र यांचे चिंतन करूया. मनोबोधाच्या या वाटेवर आपल्याला वेळोवेळी मार्गदर्शन 'मनाचे श्लोक' करीत आहेत. ते आपल्या आयुष्यात किती प्रभावी ठरतात, हे आपण पाहत आहोत.

**श्लोक**

**सदा चक्रवाकासी मार्तंड जैसा ।**
**उडी घालतो संकटी स्वामी तैसा ।**
**हरिभक्तीचा घाव गाजे निशाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।। ३७ ।।**

आपण पाहिले, की श्लोक क्र. २७ ते ३७ या श्लोकांचे शेवटचे चरण 'नुपेक्षी कदा राम दासाभिमानी' असे सारखेच आहे. त्यातील हा शेवटचा श्लोक. या श्लोकांमध्ये प्रभू श्रीरामचंद्र आपल्या भक्ताची कोणत्याही प्रसंगी उपेक्षा करीत नाहीत, असे आश्वासक प्रतिपादन समर्थांनी केले आहे.

पुढे त्यातच त्यांनी मनाला 'मना तुची रे सत्य शोधूनी पाहे,' असेही आवाहन केले आहे.
या श्लोकात समर्थांनी आणखी एक उदाहरण दिले आहे ते चक्रवाक पक्ष्याचे. हा पक्षी कधीही एकटा नसतो. जोडप्यानेच राहतो. नर व मादी एकमेकांशी मरेपर्यंत एकनिष्ठ राहतात हे या पक्ष्याचे वैशिष्ट्य.
या चक्रवाक पक्ष्याची एक पुराणकथा अशी आहे. एकदा एका नदीच्या तीरावर चक्रवाक पक्ष्याचे युगल भ्रमण करीत होते. सायंकाळ झाली आणि एका तीरावर नर आणि दुसऱ्या तीरावर मादी असे वेगळे झाले. रात्र झाली तशी या दोघांची ताटातूट झाली. जसजशी रात्र पुढे सरकत गेली तसा त्या दोघांना एकमेकांचा विरह सहन होईना. ते आकांताने एकमेकाला आवाज देऊ लागले. व्याकुळ साद घालू लागले. त्यामुळे नदीकाठी मोठा आक्रोश ऐकू येऊ लागला. हे त्यांचे करुण साद घालणे पहाट होऊन सूर्योदय होईपावेतो सुरूच होते. उजाडल्यावर त्यांना एकमेकांचे दर्शन झाले आणि त्यांची पुन्हा भेट झाली.
या श्लोकात 'मार्तंड' म्हणजे 'सूर्य' असा अर्थ आहे. ज्याप्रमाणे चक्रवाक पक्ष्याच्या मदतीला देव मार्तंड होऊन धावून आला. अगदी त्याचप्रमाणे देव भक्ताच्या सहाय्याला सत्वर धावून येतो. तसे त्याचे ब्रीदच आहे, असा या श्लोकाचा मतितार्थ आहे.
एखाद्या नगाऱ्यावर टिपरीचा घाव बसला की नाद उत्पन्न होतो. त्याचा प्रतिध्वनी परिसरात उमटतो. म्हणून
'हरिभक्तीचा घाव गाजे निशाणी',, म्हणजेच भक्ताच्या मदतीला देव धावून येतो, हे वारंवार पाहायला मिळते. परंतु त्यासाठी अंतरी देवाचा धावा हवा. सारा भार देवावर ठेवला की देवही अंतर देत नाही. दृढविश्वास मात्र ठेवायला हवा.

एकदा एका महापुरातून आश्चर्यकारकरित्या वाचलेल्या एका भक्ताने देवाकडेच गाऱ्हाने केले. त्याने देवाला तक्रार केली, की मी तुझा इतका धावा केला परंतु तू माझ्या मदतीला धावून आला नाहीस. शेवटी मीच धीर एकवटून हात-पाय मारले. काही अंतरावर एक ओंडका वाहत होता. त्याला घट्ट धरले आणि कसाबसा जीव वाचवून काठावर आलो. त्यावर देवाने हसून सांगितले, की अरे बाबा मी वेळोवेळी तुझ्यासोबतच होतो. महापुरात तू पडण्याआधी एका अनोळखी व्यक्तीने 'तुला काळजी घ्या' म्हणून सांगितले. तो मीच होतो. पुढे तुझ्याजवळून एक गाय वाहत गेली. तिची शेपटी तू सहज पकडू शकत होतास. परंतु तसे केले नाहीस. नंतर पुरात तुझ्या जवळून वाहत जाणारा ओंडका मीच पाठविला होता. त्याहीपेक्षा तुझ्या अंतर्मनात तुला धैर्य देणारा तुझा 'आतला आवाज' देखील मीच होतो. तेव्हा, 'मी तुझ्या मदतीला जाऊन आलो नाही' असे म्हणणे योग्य नाही.
या छोट्याशा कथेतून आपल्याला तात्पर्य काढता येते. आपल्या अंतर्मनात येणारा एखादा चांगला विचार हा देखील देवाप्रमाणेच असतो. अशा वेगवेगळ्या स्वरूपात देव सदैव आपल्या जवळपास असतो. देव ओळखण्यासाठी मात्र मनाची कसोटी लागत असते. परीक्षा द्यावी लागते.
नामस्मरण, चिंतन आणि भक्तीभाव यांच्या वाटेने गेले की मग हे साध्य होते.

तुकोबा म्हणतात...
**धरा बळकट भाव, तुम्हा पाशी आहे देव ।**
**कारे हिंडता रानोरानी, पुसा संताशी जाऊनी ।**

**जय जय रघुवीर समर्थ!**

**भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : 94203 89541**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**